यावरील वचनांची ४२१४१ मा.८.८९

कोडोली

श्री यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, कोडोली ता. पन्हाळा जि. कोल्हापूर या संस्थेत "कायम विना अनुदान तत्वावर" खाजगी आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी व त्याबाबतच्या अटी व शर्ती.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग.
शासन निर्णय क्रमांक:एडीआर/२५८९/२२४७/एमईडी-७.
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:२:सप्टेंबर:१९८९.

शासन निर्णय:-महाराष्ट्र राज्यात वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधा जास्त प्रमाणांत उपलब्ध व्हाव्यात अशी सतत्तची मागणी वाढत आहे. तसेच वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी या राज्यातील विद्यार्थी अहमहमिकेने पुढे येत आहेत. तसेच उच्च गुण प्राप्त विद्यार्थ्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश न मिळाल्यामुळे नैराश्याची भावना येण्याची शक्यता आहे. त्यामुळे जनतेची मागणी व काही अंशी गरज भागविण्यासाठी "कायम विना अनुदान तत्वावर" खाजगी आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या संस्थेने शासनाकडे कायम विना अनुदान तत्वावर आयुर्वेदिक महाविद्यालय सुरु करण्याची परवानगी मागितली होती व ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. तथापि विना अनुदान तत्वावर आयुर्वेदिक/ युनानी कॉलेज सुरु करण्यात येवून नंतर अनुदान मागण्यांत येते असाही शासनाचा अनुभव आहे. तथापी श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाने शासनाकडे अनुदान मागितले जाणार नाही अशी हमी दिल्याकारणाने, व दिलेल्या हमीनुसार संस्था शासनाशी व्यवहार करेल अशी खात्री झाल्यामुळे, शासनाने श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळास कोडोली, ता. पन्हाळा जि. कोल्हापूर येथे कायम विना अनुदान तत्वावर आयुर्वेदिक कॉलेज सुरु करण्याची तात्पुरती [प्रोव्हीजिनल] परवानगी शैक्षणिक वर्ष १९८९-९० पासून देण्याचा निर्णय घेतला आहे.

४. तरी या निर्णयाव्दारे शासन श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर या संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर कोडोली, ता. पन्हाळा जि. कोल्हापूर येथे सन १९८९-९० या शैक्षणिक वर्षापासून आयुर्वेदिक महाविद्यालय सुरु करण्याची खालील अटींच्या आधीन राहून परवानगी देत आहे.

YASHWANT AYURVEDIC COLLEGE, KODOLI
INWARD OUTWARD NO. 9
FILE NO
DATE 01/9/1989

Medical Officer,
Rural Hospital Kodoli-416114.
TRUE COPY

५. सदर महाविद्यालयासाठी खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील:-

१] आयुर्वेदिक महाविद्यालयाची प्रवेश क्षमता ६० इतकी राहील.

२] वार्षिक शैक्षणिक शुल्क प्रत्येक विद्यार्थ्यामागे रुपये १५,०००/- पेक्षा जास्त आकारण्यात येऊ नये.

३] मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जागा राखून ठेवण्याबाबत संस्थेच्या प्रवेशाबद्दल कोणताही निर्बंध संस्थेवर असणार नाही.

४] प्रवेश क्षमतेपैकी १० टक्के जागा संस्थेने भराव्यात व उरलेल्या ९० टक्के जागा सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "अ" प्रमाणे भराव्यात.

५] एकूण प्रवेश संख्येपैकी १० टक्के जागा व्यवस्थापनाच्या इच्छेनुसार भराव्यात. व या जागांसाठी विद्यार्थ्यांनी किमान ५० टक्के गुण मिळविलेले हवे. इंग्रजी विषयात व भौतिकशास्त्र [फिजिक्स] रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयात मिळून ५०% पेक्षा कमी गुण असू नयेत. तसेच विद्यार्थी एकाच प्रयत्नात उत्तीर्ण झालेला असावा. उर्वरित जागा सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे भराव्यात.

६] साधारणपणे आयुर्वेद महाविद्यालयांच्या प्रवेशासंबंधी शासनाचे जे प्रवेश नियम आहेत, त्याच धर्तीवर खाजगी संस्थांना सुयोग्य ठरतील असे नियम त्यांनी विहित केले जावेत.

७] विद्यार्थ्यांचा निवड करण्यासाठी संस्थेने एक निवड समिती नेमावी व त्यात शासनाचा प्रतिनिधी म्हणून सहाय्यक आयुर्वेद संचालक, पुणे हे राहतील.

८] आयुर्वेदिक महाविद्यालयांच्या शिक्षणाचा दर्जा हा भारतीय चिकित्सा परिषद नवी दिल्ली, केंद्र शासन व राज्य यांच्या मानदंडाप्रमाणे असणे अत्यंत आवश्यक आहे. व हे दंडक ~~[illegible]~~ सव्वा वर्षांच्या आत संस्थेने पूर्ण करणे आवश्यक आहे. म्हणून संबंधित संस्थेवर खालील गोष्टी बंधनकारक राहतील. [१५ महिन्याच्या आत]

अ] एका विद्यार्थ्याला २ खाटा याप्रमाणानुसार आयुर्वेदिक महाविद्यालयांना संलग्न असणारी जी रुग्णालये आहेत त्यात १२० खाटांची यथायोग्य व कायम स्वरूपात व्यवस्था केली पाहिजे. ही व्यवस्था बी.ए.एम.एस. च्या दुसऱ्या वर्गाचे शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या आधी ४ महिन्यांच्या आत पूर्ण करून शासनाला त्याप्रमाणे कळवावे.

ब] शासनाची एक उच्चस्तरीय समिती या वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षणाचा दर्जा व प्रगती योग्य रितीने होत आहे किंवा नाही या गोष्टींवर लक्ष ठेवून शासनास योग्य त्या शिफारशी करील.

-३-

Medical Officer
Rural Hospital Kodoli-416114.
TRUE COPY

क] वैद्यकीय शिक्षणासंबंधी अस्तित्वात असलेले व पुढे अस्तित्वात येणारे जे कांही नियम असतील ते पाळणे संस्थेवर बंधनकारक राहील.

९] या महाविद्यालयांच्या प्रशासनावर व कार्यक्षमतेसंबंधी शासनाचे नियंत्रण असण्यासाठी शासनाचा एक प्रतिनिधी संस्थेच्या कार्यकारी मंडळावर राहील.

१०] आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी अनुदानाची मागणी या संस्था शासनाकडे करणार नाहीत असे लेखी अभिवचन त्यांनी शासनास दिले पाहिजे.

११] उपरोक्त अट क्रमांक ४ संबंधीचे स्पष्टीकरण सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये पहावे.

वरील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेने शासनाला लेखी लिहून देणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[अ. दा. साने]
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव.

प्रति,

~~राज्यपालांचे सचिव.~~
मुख्य मंत्र्यांचे सचिव.
मुख्य सचिव.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
प्रशासक [सा. प्र.] आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई-४०००१८.
सहाय्यक संचालक, आयुर्वेद पुणे, नागपूर, मुंबई.
सचिव, विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रबंधक, उच्च न्यायालय [ओरिजनल साईड] [पत्राव्दारे].
प्रबंधक, उच्च न्यायालय [ॲपिलेट साईड] [पत्राव्दारे].
महासंचालक, प्रसिध्दी व माहिती संचालनालय, मुंबई.
सर्व मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक.
मंत्रालयीन सर्व विभाग.
शिक्षण विभाग [तामि १ /व तांशि-३/विशी-२] मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालय, मुंबई.
शासकीय आयुर्वेद महाविद्यालयांचे सर्व अधिष्ठाते.
श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, कोडोली, ता. पन्हाळा. जि. कोल्हापूर-४१६११४.
कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर [पत्राव्दारे].
निवड नस्ती.

शिदि. २. ९. ८९.

Rupal ... 416114

TRUE COPY

Page No - 2

## परिशिष्ट "अ"

विना अनुदान तत्वावरील "खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांसाठी प्रवेश अर्हता निकष एकूण १०० प्रवेश जागा हे प्रमाण धरून बाबी खालीलप्रमाणे ठरण्यात यावे :-

१] संस्थेच्या एकूण ६० प्रवेश जागांपैकी ६ प्रवेश जागा आपल्या इच्छेनुसार संस्था भरील, उरलेल्या जागांपैकी,

अ] ४० प्रवेश जागा स्थानिक उमेदवारांसाठी गुणवत्तेनुसार भराव्या, स्थानिक मर्यादा संस्थेने ठरवाव्यात. परंतु ही स्थानिक मर्यादा ठरविण्यापूर्वी प्रत्येक संस्थेने स्थानिक मर्यादेच्या संबंधीचा ठराव पास करावा व शासनाची तशी परवानगी xxxx घ्यावी. प्रचलित नियमानुसार मागासवर्गीयांकरिताच्या आरक्षणाबाबतची दक्षता घेतली जावी.

ब] ~~xxxxxxxx~~ १४ प्रवेश जागा संस्थेकडे संपूर्ण महाराष्ट्रातून प्राप्त झालेल्या अर्जामधून गुणवत्तेनुसार भराव्यात.

२] संस्थेने अर्जाचा नमुना वरील अट क्रमांक ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विहित नमुन्याप्रमाणे तयार करावा.

३] अ] भारताचे नागरिकत्व धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. मात्र संस्थेच्या १० टक्के ६ जागांपैकी २ जागांपर्यन्त अनिवासी नागरिकांस ही अट लागू नाही.

ब] विद्यार्थ्यांचे वय प्रवेश घेण्याच्या वेळी किंवा संबंधित शैक्षणिक वर्षातील दिनांक ३१ डिसेंबर रोजी १७ वर्षे पूर्ण असले पाहिजे.

क] गुणवत्तेनुसार संस्था ज्यांना प्रवेश देईल त्या यादीतील एखादा विद्यार्थी विहित वयापेक्षा कमी वयाचा असला, परंतु तो जर गुणवत्ता यादीमध्ये असेल तर अशा विद्यार्थ्याला १७ वर्षे पूर्ण झाल्याबरोबर लगेचच्या पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश देण्यात यावा असा प्रवेश द्यावयाच्या वेळी इतर विद्यार्थ्यांसाठी केलेल्या गुणवत्ता यादीत तो पात्र ठरतो किंवा नाही हे बघण्याची आवश्यकता राहणार नाही. जर संबंधित विद्यार्थ्याने लगेचच्या पुढील शैक्षणिक वर्षात हा फायदा घेतला नाही तर तो संधी मिळण्यास तो पुन: पात्र ठरणार नाही.

Medical Officer.
Rural Hospital Kodoli-416114.
TRUE COPY

४] शैक्षणिक अर्हता :- [अ] वैद्यकीय महा विद्यालयात प्रवेश मिळण्यास पात्र होण्यासाठी म्हणून विद्यार्थी बारावीची परीक्षा किंवा तत्सम परिक्षा भौतिक रसायन व जीवशास्त्र हे विषय घेऊन तसेच इंग्रजी हा विषय घेऊन उत्तीर्ण झाला पाहिजे. या परीक्षेत एकाचवेळी विज्ञान व रसायनशास्त्र व जीवशास्त्र व इंग्रजी विषया-सहीत विद्यार्थ्याला किमान ५० टक्के गुण मिळाले असले पाहिजेत. ही अट व्यवस्थापनाच्या मर्जीनुसार भरल्या जाणाऱ्या १०% टक्के भागासाठी सुध्दा बंधनकारक आहेत.

ब] संस्थेच्या इच्छेनुसार १० टक्के विद्यार्थ्यांबाबत

संबंधित विद्यार्थी भारतातील किंवा विदेशातील कोणत्याही मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांमधून [१० + २] बारावीची परीक्षा किंवा तत्सम परीक्षा विज्ञान भौतिक, रसायन व जीवशास्त्र या विषयासह उत्तीर्ण असावा. मात्र विदेशातील विद्यार्थ्यांची संख्या २ पेक्षा जास्त नसावी.

क] स्थानिक विद्यार्थ्यांबाबत.

संबंधित विद्यार्थी स्थानिक भागामधून कोणत्याही मान्यताप्राप्त शिक्षण संस्थामधून [१० + २] बारावीची परीक्षा किंवा तत्सम परिक्षा विज्ञान [भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र] हे विषय घेऊन इंग्रजीसह या विषयात उत्तीर्ण असावा.

ड] इतर विद्यार्थ्यांबाबत

संबंधित विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांमधून [१० + २] बारावीची परीक्षा किंवा तत्सम परीक्षा विज्ञान [भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र] हे विषय घेऊन इंग्रजीसह या विषयात उत्तीर्ण असावा.

५] विद्यार्थ्यांनी खालील दर्शविलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील :-

१. भारतीय नागरिकत्वाचे प्रमाणपत्र [ हे प्रमाणपत्र विदेशातील विद्यार्थ्यांस आवश्यक नाही ]
२. जन्मतारखेचा दाखला.
३. बारावी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.
४. शाळांत परीक्षेचे प्रमाणपत्र.
५. बारावीच्या परीक्षेचे गुणपत्रक.
६. विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेण्यास शारिरीकदृष्टया पात्र आहेत किंवा नाही याचे रजिस्टर्ड वैद्यकीय प्रॅक्टीशनरचे प्रमाणपत्र

Medical Officer.
Rural Hospital Kodoli-416114.

TRUE COPY

६] गुणातून कांही गुण वजा करण्यासंबंधी व बोनसगुण देण्यासंबंधीची जी शासनाची तरतूद आहे ती संस्थेवर बंधनकारक राहिल.

७] वागणूक व शिस्त

शासनाने केलेले विविध नियम व कायदे यानुसार एखादा विद्यार्थी जर राष्ट्र विघातक कार्य करतो किंवा त्यात गुंतला आहे असे जर आढळले तर संस्थेने त्या विद्यार्थ्याला काढून टाकले पाहिजे.

जर एखाद्या विद्यार्थ्याने खोटे प्रमाणपत्र, किंवा खोटे प्रतिज्ञापत्र त्याच्या प्रवेशाच्या वेळेस दाखल केले असल्याचे आढळून आले तर त्याचा प्रवेश संस्थेने तात्काळ रद्द करावा.

संस्थेत विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करीत असता रॅगिंग करीत असल्याचे आढळून आले किंवा सिध्द झाले तर अशा विद्यार्थ्यांवर संस्थेने तात्काळ कार्यवाही करुन प्रवेश रद्द करावा. प्रत्येक विद्यार्थ्यांकडून संस्थेने चांगल्या वागणूकीसंबंधी व नियम मान्य असल्याचे एक हमीपत्र लिहून घ्यावे.

टिप:- संबंधित संस्थांनी याप्रमाणे अर्हता नियम छापावे.

८] उपरोक्त संस्था जोपर्यन्त भारतीय चिकित्सा परिषदे व्दारा मान्यताप्राप्त होऊ शकत नाही तोपर्यन्त तेथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात बदलीने प्रवेश किंवा परस्पर बदलीने प्रवेश मिळणार नाही हे समजले असे संस्थेने विद्यार्थ्यांकडून लेखी घ्यावे

९] उपरोक्त वैद्यकीय महाविद्यालयातून विद्यार्थ्याने अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर शासन अशा विद्यार्थ्यांना नोकरीची हमी देणार नाही हे विद्यार्थ्यांना कळवावे.

१०] उपरोक्त संस्थेने विद्यापीठाशी अभ्यासक्रमाबाबतचे संलग्नीकरण परस्पर करुन घ्यावे.

----

सौ. परब२९८१

Medical Officer.
Rural ... ...doli-416114.
TRUE COPY

Page No - 4

To

Run permanent unaided private Ayurvedic College to
Shri Yashwant Shikshan Prasarak Mandal, Kodoli
Tal. Panhala, Dist. Kolhapur
To fulfill the condition, Rules & Regulations

---

Government of Maharashtra
Medical Edu. & Medicinal Dept.
Government Resolution no. ADR/2589/2247/MED-7
Mantralaya, Mumbai 400032.
Dated. 2 September 1989

---

Government Resolution :- It is always demanded that in the state of Maharashtra Medical provisions & facilities must be improved. And to fulfill all these demands so many students are trying their best. Those are from all the categories.

2) Government has passed a bill that on permanent unaided basis some institutions will get permission to run "Ayurvedic College" Yashwant Shikshan Prasarak Mandal, Kodoli was also the well-known institution & Govt. of Maharashtra granted our institution to run 'Yashwant Ayurvedic college in Kodoli.

3) No grant will be provided to this institution and this was the condition & our institution accepted all the conditions & regulations & started the college.

4) Government of Maharashtra has granted us provisional permission to run college in the year 1989-90

BHAUSO S. AMBEKAR
M. Com., LL.B.(Spl.)Advocate
Off. Jafsandikar, Wada Panhala
At. Ambawada, Tal. Panhala

Following conditions & Regulations are obligatory:-

1. Intake capacity of Ayurvedic College will be - 60 seats.

2. Tution fees (Education fees per student) will be Rs.15000/-

3. Reservation will be there.

4. 10% seats will be filled by Management Quota.

5. 10% seats will be filled by Management but minimum percentage must be 50%

6. All the rules must be followed as per Govt. rules.

7. To select a student (candidate) there must be selection committee & there must be co-director Ayurvedic, Pune as Government Nominee.

8. Ayurvedic College must follow all the rules & regulations of C.C.I.M. New Delhi.

A) Every student should get two beds in the hospitals, it means Ayurvedic college must possess 120 beds hospital before commencement of 2nd year.

B) Government's Committee will visit & suggest the Govt. time to time.

BHAUSO S. AMBEKAR
M. Com, LL.B.(Sp.) Advocate
Off. Jaraandikar, Wada Panhala
At. Ambawade, Tal. Panhala

C)All the rules & regulations prescribed by Govt. are obligatory to this institution.

9.Govt. representative (Nominee) will be there to control administration & efficiency of the institution.

10.The institution will expect no financial aid. All the above conditions rules & regulations are obligatory to our institution & we are bounded to that.

11.Above mentioned explanation should be seen in the condition '4' in Appendix A.

Above conditions, rules & regulations are obligatory to our institution & we are bounded to give undertaking to the Govt. of Maharashtra.

According to the order & name of the Chancellor.
Sd/-
(A. D. Sane)
Deputy. Secretary Govt. of Maharashtra

Copy to: -

1) Secretary of the Chancellor.
2) Secretary of the Chief Minister
3) Secretary head,
   Director Medical Education & Research Bombay
4) Administrator, Director of Ayurved Warali, Bombay-400018
5) Co-Director Ayurved Pune, Nagpur, Bombay.
6) Secretary Ministry of Maharashtra, Bombay.
7) Auditor, High Court by Correspondence
8) Auditor, High Court, by correspondence.
9) Personal assistants of all the ministers.
10) Departments of all the ministries.
11) Department of Education (Technical Edu. -1/Tech-Edn. -3/D-Edn. -2) Ministry of Bombay.
12) Director, Medical Education & Research Centre Bombay.
13) Deans, All the Government Ayurvedic Colleges.
14) The Secretary – Shri Yashwant Shikshan Prasarak Mandal, Kodoli
   Tal. Panhala, Dist. Kolhapur-416114
15) Vice – Chancellor, Shivaji University, Kolhapur (By correspondence)

***It is certified that, this letter is translated into English from original letter by Govt. of Maharashtra, Mumbai which is in Marathi Language. For legal matters original Marathi letter will be considered as authentic.***

BHAUSO S. AMBEKAR
M. Com. LL.B.(Spl.)Advocate
Off. Jaraandikar, Wada Panhala
At. Ambawade, Tal. Panhala

# Appendix – A

For unaided private Ayurvedic college minimum qualification considering 100 seats distribution will be as follows: -

1. Out of 60 seats, 6 seats will be filled or admitted by management (Quota)

   A) By remaining 40 seats will be admitted from the local candidates.

   B) 14 seats will be filled throughout Maharashtra State.

2. Institution has to prescribe prospects.

3. A) Indian citizen will get admission & only two seats will filled by foreign countries.

   B) Students must has completed 17 years before 31st December.

   C) When student will be selected as per merit but he does not have completed 17 years, then he will be admitted in the next year.

BHAUSO S. AMBEKAR
M. Com. LL.B. (Spl.) Advocate
Off. [illegible] Wada Panhala
At. [illegible], Tal. Panhala

A) Educational Qualifications: - To admit medical college student must pass XIIth std. (10+2) with Physics, Chemistry, Biology & English. He should possess minimum 50% marks. This qualification is also necessary for management quota.

B) 10% management seats: -

Concerned student for management seat can be Indian or foreigner but he should have passed 12th std (10+2) with Physics, Chemistry and Biology. But foreigner students must be two not more than two.

C) For Local Students: -

Local & concerned students must have passed 12th std. (10+2) from recognised school with Physics, Chemistry, Biology & English.

D) Other students: -

Concerned students should have passed 12th std. (10+2) from recognised school with Physics, Chemistry, Biology & English.

5. Students have to produce following certificates: -

1) Nationality / Domicile certificate.
2) Birth date certificate.
3) HSC passing certificate.
4) SSC passing certificate.
5) HSC mark list.
6) Physical fitness certificate. (Registered Medical Officer)

BHAUSO S. AMBEKAR
M. Com. LL.B. (Spl.) Advocate
Off. Jarandiker, Wada Panhala
At. Ambawade, Tal. Panhala

202

6. Bonus marks & relaxation is totally binding on the institution as per Govt. provision.

7. Discipline & Code of conduct: -

Student will be restigated when he or she will do any illegal activity.

If someone produced dummy certificate & sought admission and if he found guilty, his admission will be cancelled. If someone found in ragging then his or her admission will be cancelled.

Every student has to give undertaking for the discipline, character, and good conduct.

Note: - Every Institution must prescribe prospectus: -

8) Above mentioned institution must get permission from central council of Indian Medicine, New Delhi.

Unless this institution gets permission from CCIM the students cannot transfer from this institution to other institution Institution can take undertaking from the student.

9. In above-mentioned institution when students complete their degrees Government will not assure them for service. It must be noticed to the students.

10. Institution must be affiliated to the university. Where the college is situated.

***It is certified that, this letter is translated into English from original letter by Govt. of Maharashtra, Mumbai which is in Marathi Language. For legal matters original Marathi letter will be considered as authentic.***

BHAUSO J. AMBEKAR
M. Com. LL.B.(Spl.)Advocate
Off. Jaraandikar, Wada Panhala
At. Ambawade, Tal. Panhala

Translated total Page 1 to 4